## आदेश

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि/ 431 /2021
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 26 /02/ 2021

**विषय :-** भूसंपादन प्रकरण क्रमांक 28/2008-09 मौजे कोदरखेड ता.नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत क्षेत्र) प्रकरणात निवाडयाकरीता मुदत वाढ मिळणेबाबत.

**संदर्भः-** उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प बुलडाणा यांचे पत्र क्रपत्र क्र.कावि/वशी/उपभुसं/म.प्र./अ.का./28/2021 दिनांक 17/02/2021. (प्राप्त दिनांक 18-02-2021)

*****

ज्या अर्थी उपजिल्हाधिकारी भूसंपादन मध्यम प्रकल्प. बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक 28/2008-09 मौजे कोदरखेड ता.नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत क्षेत्र) प्रकरणात निवाडयाकरीता मुदत वाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यात आला आहे.

उपजिल्हाधिकारी भूसंपादन म.प्र. बुलडाणा यांनी सदर प्रकरणाची कलम 19 ची अधिसुचना ची अंतीम प्रसिध्दी राजपत्रात 18 मार्च 2020 रोजी करण्यात आली असून सदर प्रकरणात कलम 21 ची कार्यवाही झाली असून प्रकरण निवाडयाकरीता असून कलम 19 पासून 12 महिन्याचे आंत म्हणजे दिनांक 17-03-2021 पर्यंत निवाडयाची कार्यवाही होणे आवश्यक आहे. परंतु सरदहू प्रकरणात कलम 21 वरील हरकतीवरील अभिप्राय, संपादीत जमीनीतील मालमत्तेचा तसेच वनझाडांचा मुल्यांकन अहवाल तसेच सदर प्रकरणात निधी रू. 55.15 कोटी अप्राप्त असून उपरोक्त कार्यवाहीसाठी काही कालावधी लागणार असल्यामुळें प्रकरणातील निवाडयाच्या कार्यवाहीसाठी बारा(12) महिन्याची मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय,लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल.अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे नियम 25 मधील तरतुदीनुसार भुसंपादन प्रकरण क्रमांक 28/2008-09 मौजे कोदरखेड ता.नांदुरा जि.बुलडाणा (बुडीत क्षेत्र) या प्रकरणात निवाडा करण्यास 12 (बारा) महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(एस.रामामूर्ती-भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी बुलडाणा